नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख अहमद
निशाणी क्रमांक १३

सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०२ ची साक्ष शपथेवर सुरू :–

माझे नाव :– जिग्नेश नरोत्तमदास भयानी
वय :– ४५ वर्ष, व्यवसाय :– व्यवसाय,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू :–

१. पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नाही. मी फिर्यादीला ओळखतो. ते माझ्या समाजाचे आहे. त्यांचे घरी चोरी झाल्याचे मला कळले होते. त्यांचेकडे काय चोरी गेले हे मला माहीती नाही. पोलीसांनी मला पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचनापत्र दिले नाही. माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व पंचनामा करण्यात आला नाही. पोलीसांनी माझी सही घेतली होती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझ्या सहया आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहिपुरता अनुक्रमे **नि.क्र.१४ व १५** देण्यात येते.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणने खरे नाही की दिनांक ०६.०३.२०२५ रोजी पोलीसांनी मला सुचनापत्र दिले होते व त्या अनुषंगाने घटनास्थळी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचना दिल्या. हे म्हणने खरे नाही की त्या अनुषंगाने मी घटनास्थळी हजर झालो त्यावेळी माझेसोबत दर्शन धंदुकिया हजर होते. हे म्हणने खरे नाही की माझ्यासमक्ष फिर्यादीने पोलीसांना घटनास्थळ दाखविले. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला व त्यावर मी वाचुन समजुन सही केली. हे म्हणने खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांचेमार्फत.

३. हे म्हणने खरे नाही की फिर्यादीच्या घरी चोरी झाल्याबाबत मला कळाल्याची मी खोटे सांगतो.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 16:52:05 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६.**

**माझे समक्ष,**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६**